शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारु सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ताः शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १११ वा | मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



## संपादकीय


# निर्भय, निकोप वातावरणात निवडणुका व्हायला हव्यात!

लोकशाहीच्या देशात लोकशाहीतील सर्वोच्च उत्सव म्हणजे निवडणूका. महाराष्ट्रात आपण दिनांक २० नोव्हेंबर रोजी अतिशय निर्णायक अशा निवडणूकीला सामोरे गेलो, मतदान केले. मतदान केल्यानंतर आनंद होतो. या दरम्यान महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठी एक सामाजिक कार्यकर्ते म्हणून जाणीवपूर्वक निर्णय करून त्या सगळ्या प्रक्रियेत जवळून सहभाग घेतला. आम्ही नेहमीच म्हणत आलो की, ही निवडणूक देशाचे संविधान वाचवण्यासाठी आपण महत्त्वाची मानत आहोत. पण केवळ भाषणांमध्ये संविधान वाचवायचे, असे म्हणणे आणि तशी घोषणा देणे पुरेसे नाही. प्रत्यक्ष संविधानामध्ये जे अधिकार आपल्याला दिलेले आहेत, त्याची पायमल्ली होत असताना प्रत्यक्ष फिल्डवर, जमीन स्तरावर कृती करणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच सर्वप्रथम ज्यावेळेला प्रत्येक बूथवर पोलिंग एजंट बसवण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यावेळेला जवळून अनुभवले, किती बाजारू पद्धतीने चालते. म्हणजे एका बुथवर एक पोलिंग एजंट बसवण्याचा उमेदवार दर लावतात. कोणतेही प्रशिक्षण नसताना, प्रत्यक्ष तिथे जाऊन काय करायचे ? हा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतर मी मतदानाला गेलेल्या वेळी विचार केला की, आपण हे या निर्णायक क्षणी का सहन करतोय ?

मी संबंधित उमेदवाराच्या प्रतिनिधीला शांतपणे जिथे निवडणूक आयोगाने आखलेली रेषा खाली होती त्या रेषेच्या बाहेर उभा राहायला सांगितले. तुम्ही प्रतिनिधी आहात आणि इथे बाहेर उभे राहा. आलेल्या मतदारांशी बोलायचं काहीच कारण नाही आणि इथे जर तुम्ही प्रचार केलात, तर त्यावर माझी हरकत आहे. तेवढेच म्हणून मी थांबले नाही, तर सीव्हीजल नावाच्या ॲपवर मी त्या प्रतिनिधीच्या पुढच्या बाजूला उभे राहून माझा व्हिडीओ केला आणि ती तक्रार सीव्हीजलवर दाखल केली. त्या माझ्या तक्रारीत तीन गोष्टी नमूद केल्या. पहिली गोष्ट म्हणजे, उमेदवाराचा प्रतिनिधी अमुक-अमुक या ठिकाणी उभे राहून प्रचार करत आहे. दुसरी ज्या ठिकाणी त्या उमेदवाराचे गुंड जे विभागात, प्रभागात माहिती आहेत ते उभे आहेत. पण त्यांच्या उभ्या असण्याने दहशत निर्माण होते आहे. सांगायला हरकत नाही इथे त्याचे काही तडीपार होते ऑन रेकॉर्ड. त्यानंतर त्या ठिकाणी बसलेल्या पोलीस बाई होत्या, त्या शांतपणे विरुद्ध दिशेला तोंड करून त्यांच्या कोणातरी फॅमिलीतल्या नातेवाईकांशी फोनवर गप्पा मारत होत्या. हे सगळं व्हिडीओमध्ये रेकॉर्ड करून मी तो व्हिडीओ अपलोड केला आणि त्यानंतर वीस मिनिटांच्या आत त्या बुथवर प्रत्यक्ष स्क्वाड आले. ज्यामध्ये प्रांताधिकारी स्तरावरचे महसूल अधिकारी, निवडणूक स्क्वाड म्हणून नेमलेले होते आणि त्यांनी मला फोन करून सगळी माहिती घेतली. त्याच वेळेला मी अशीही तक्रार नमूद केली की, शंभर मीटरच्या आतमध्ये उमेदवाराचा बूथ लागलेला आहे की, जो त्यांनी तातडीने बाहेर काढला. केवळ संविधान वाचले पाहिजे, असे म्हणून चालणार नाही, तर संविधानाला अपेक्षित असणाऱ्या निर्भय आणि निकोप वातावरणात निवडणुका घडत असताना आदर्श आचारसंहितेच्या विरोधात घडत असलेल्या घटना जेव्हाच्या तेव्हा थांबवणे आणि आधी आपण निर्भयपणे भूमिका घेणे हे मला अतिशय महत्त्वाचे वाटते. हे असे करता येते आणि ते केले पाहिजे, तरीही आपण सुरक्षित राहू शकतो. याचे समाधान आणि आनंदही मिळतो. चुकीचे वागणाऱ्यांच्या वरती वचक निर्माण होतो. आपण त्याकडे दुर्लक्ष करून निघून गेलो, तर ती परिस्थिती बदलणार नसते. मग हळूहळू त्या संदर्भामध्ये बोगस मतदानापर्यंत प्रकरण जाऊ शकते. उमेदवाराच्या विरोधात मतदार येण्यापूर्वीच मतदान होण्याची शक्यता वाढते. या सगळ्या आमच्या कृतिशील भूमिकेचा एवढा चांगला परिणाम झाला की, आमच्या कॉलनीत कोणीही उमेदवारांनी पाठवलेल्या रिक्षात बसायला तयार होईना. एका ठिकाणी पैसे वाटत होते तिथले शूटिंग केले तक्रार दाखल केली. बऱ्याच जणांनी स्टेटसवर आपल्या उमेदवाराचे चिन्ह आणि मतदान करा, असे आवाहन केले होते. त्याला हरकत घेतली. त्यामुळे तातडीने लोकांनी तेही स्टेटस काढून टाकले. एका ठिकाणी तर थेट नगरसेविकाच बुथवर आतमध्ये बसून आपल्या नेत्याचे मतदान करून घेत होत्या. त्यांची तक्रार केल्याक्षणी त्यांनाही तिथून निघून जावे लागले. अशा अनेक गोष्टी सीव्हीजलच्या मदतीने आम्ही करू शकलो आणि संपूर्ण दिवसभर निवडणूक आयोगाने नेमलेले सीव्हीजलचे स्क्वाड मतदारसंघात फिरत राहिले आणि सगळे जे कमांडो होते ते परत जात होते. काश्मीर आणि झारखंडचे त्यामुळेही खूप मोठ्या प्रमाणावर या सगळ्यावर वचक निर्माण करणे शक्य झाले आणि म्हणूनच केवळ निवडणुका निकोप वातावरणात झाले म्हणणे पुरेसे नाही संविधान वाचला पाहिजे, म्हणणे पुरेसे नाही, तर प्रत्यक्ष जमीनस्तरावर उतरून थेट बूथ पातळीवर उतरून कृती करू शकलो. या पुढील काळातही सीव्हीजल या ॲपच्या संदर्भात आपल्याला कृतिशील राहावे लागेल. परंतु हे मात्र नक्की की, तक्रार दाखल झाल्यानंतर वीस मिनिटांच्या आत सातााऱ्यामध्ये तरी आम्ही अनुभव घेतला की, स्क्वाड ॲक्टिव्हेट होतं आणि परिस्थिती बदलते आणि चुकीचं वागणाऱ्यावर अगदी कायदेशीर कारवाई नाही, पण प्रिव्हेंटिव्ह अस्पेक्टने समज तरी मिळते आणि परिस्थिती नियंत्रणाखाली येते. ७५ वर्षांनंतरही या लोकशाही देशात जातीचे नेते जेव्हा जातीनुसार आपल्या लोकांची बोली लावतात त्यावेळेला निराश व्हायला होते. निवडणुकांत पुराव्यानिशी भूमिका घेतली. तरच आदर्श आचारसंहिता आपण पाळायला भाग पाडू शकतो. आचारसंहिता अतिशय महत्त्वाची आणि आदर्श आहे. आपण एक नागरिक म्हणून आपले संविधान वाचवण्यासाठी कायदा वाचवण्यासाठी वंचित, बहुजनांच्या बाजूने काम करणारे सरकार देशात आणण्यासाठी घेतला पाहिजे. कोट्यवधी रुपयाचा जर निवडणुका दरम्यान उमेदवाराला खर्च करावा लागणार असेल, तर निवडून येणाऱ्या उमेदवाराकडून आपण भ्रष्टाचाराशिवायच्या कामकाजाची अपेक्षा कशी करू शकतो. जाणीवपूर्वक आपण भ्रष्ट गोष्टी करणार नाही, हे आधी आपण ठरवले पाहिजे. तत्त्वनिष्ठ राजकारण होण्यासाठी आपल्याला एका फार मोठ्या राजकीय प्रक्रियेतून संपूर्ण समूहासोबत काम करावे लागेल, याची जाणीव देणारी ही निवडणूक होती. सर्वच पक्ष आणि त्यांचे नेते हे सत्तेसाठी आसुसलेले आहेत. त्यांचा हा कमी कालावधीत प्रचंड पैसा मिळवण्याचा व्यवसाय आहे. केवळ लोकशाही संविधान धर्मनिरपेक्षता, असे शब्द ते तोंडी लावण्यासाठी वापरतात. त्यामुळे पक्षांवर जरी विश्वास नसला, तरी इथल्या मतदारांच्या सामूहिक शहाणपणाच्या वर्तनावर आपण नक्कीच विश्वास ठेवू शकतो.

# वाढते प्रदुषण व बदलते हवामान रोखण्यासाठी पर्यावरण संरक्षणाची गरज

पर्यावरणाची सुरक्षा व संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रानी पर्यावरणाच्या प्रती वैश्विकस्तर यावर आणि राजनीतीक व सामाजिक जागृती आणण्याकरिता संयुक्त राष्ट्राने २६ नोव्हेंबर १९७२ ला "विश्व पर्यावरण संरक्षण दिवस" साजरा करण्याची घोषणा केली. त्यामुळे संपूर्ण जगात २६ नोव्हेंबर विश्र्व पर्यावरण संरक्षण दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. आज संपूर्ण जग सुरक्षीत रहावं असे सर्वांना वाटते. परंतु पर्यावरणाची ढासळती परीस्थिती पहाता. पृथ्वीतलावरील संपूर्ण मानवजाती व जीव-जंतु भयभित झाल्याचे दिसून येते.त्यामुळे आज जगाला पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. आज तसे पाहिले तर स्थल, जल, वायु मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाल्याचे दिसून येते. मानवाने जर पर्यावरणाला वाचविले तर जलप्रदूषण,वायुप्रदूषण व स्थलप्रदुषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरपूर मदत मिळु शकते. आज प्रदुषणामुळे संपूर्ण पर्यावरण ढासळले आहे यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे जगणे कठीण अत्यंत झाले आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात जंगल तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याचाच परीणाम पर्यावनावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो. भारतासह संपूर्ण जग विकासाकडे वाटचाल करीत आहे यात दुमत नाही.परंतु यात पर्यावरणाची छल्ली व विटंबना मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. भारतासह जगातील वाढती लोकसंख्या हीच पर्यावरण नियंत्रण ठेवण्यास मोठी अडचण असल्याचे मी समजतो. मानवाने आपल्या सुख- सुविधांसाठी पर्यावरणाकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. आज पर्यावरणावर अशी परिस्थिती आहे की "जगावं की मरावं" कारण आज पर्यावरणाचा आधारस्तंभ "वृक्ष"आहे. परंतु मानवाने वृक्ष कटाईच केली नाही; तर वृक्षांना जळामुळा सकट त्याला उपडुन फेकले. यामुळेच आज पर्यावरण मानवापासुन भयभीत आहे. आज पर्यावरणावर सर्वच काही अवलंबून आहे.आज औषधोपयोगी वनस्पती पर्यावरणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे नस्तनाबुत होत व अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे जंगलातील संपूर्ण प्राणीजाती आज शहरात, गावात प्रवेश करतांना दिसतात.यात हिंसक प्राणी शहरात व गावात प्रवेश करून मानव हानी व पाळीव प्राण्यांची हानी मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. कारण जंगल संपदा नष्ट होत आहे यामुळे जंगलात रहाणारे पशु-पक्षी यांचे खान-पान ऐका-मेकांवर अवलंबून असते.परंतु जंगल तोडीमुळे अनेक प्रजाती लुप्त होतांना दिसते किंवा त्यांची शिकार होतांना दिसते किंवा पर्यावणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे मृत्यृशी झुंज देतांना अनेक पशु-पक्षी दीसतात. त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची प्रथम जबाबदारी मानवजातीची आहे कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. आज प्लास्टीकनेसुध्दा पर्यावरणाला प्रदुषीत केल्याचे दिसून येते.मानवाने स्वतःच्या स्वथार्साठी पर्यावरणाला निचोडुन ठेवल्याचे दीसुन येते.आज जगात विश्र्व शांतीसाठी पर्यावण वाचवीण्याची गरज आहे. आज मानव जातींमध्ये वाढणारे आजार, अनेक व्याधी ह्या सर्व पर्यावरणाच्या बिघडत्या संतुलनामुळे दिसून येतात.यामुळे आज मानवाचे आयुष्यमान कमी झाल्याचे दिसून येते.पशुपक्षांचेतर जगने अत्यंत कठीण आहे.जगात वाढते कारखाने आणि जगातील युध्दसामुग्रीची होड व अनेक परमानु बॉम्बच्या चाचण्या यामुळे संपूर्ण जग प्रदुषीत होतांना दिसते.आज भारतातील जिवंत उदाहरण म्हणजे, दिल्लीतील जहरीली हवेमुळे दिल्लीकरांचा श्वास कोंडल्याचे दिसून येते. कारण दिल्लीतील प्रदुषणाने संपूर्ण सीमारेषा ओलांडल्याचे दिसून येते.कारण बुधवार दिनांक २० नोव्हेंबर २०२४ ला दिल्लीच्या हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक (एक्यूआय) ४२६ च्यावर म्हणजेच अत्यंत गंभीर पातळीवर होता.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत राजधानी दिल्लीत अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रदुषणामुळे वातावरण एवढे खराब झाले होते की ७९ विमानांना येण्यास विलंब झाला तर ६ विमानांचे मार्ग बदलविण्यात आले.यावरून आपण समजू शकतो की विमानांवर प्रदुषणाचा एवढा गंभीर परिणाम होवू शकतो तर मानवजाती, पशुपक्षी व अन्य जिवजंतुंवर कीती मोठा गंभीर आणि घातक परिणाम होत असेल हे दिल्लीच्या प्रदुषणावरून स्पष्ट दिसून येते.राजधानीतील प्रदुषण अत्यंत चिंताजनक पातळीवर गेल्याने शाळा, महाविद्यालय यांच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्याचप्रमाणे ५० टक्के सरकारी कर्मचाऱ्यांना घरूनच कामे करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. खाजगी कार्यालयांनाही बहुतांश कर्मचाऱ्यांना "वर्क फ्रॉम होम"सुविधा द्यावी असे आवाहन राज्य सरकारने खाजगी कार्यालयांना केले आहे.कारण प्रदुषणाचा धोका दिवसेंदिवस गडद होत चाललेला आहे. सध्याच्या परिस्थितीत प्रदुषनामुळे संपूर्ण दिल्ली धुंधली झालेली आहे. जगातिल १०० प्रमुख शहरांच्या तुलनेत भारतातील तब्बल ३९ शहरे प्रदुषणाने संपूर्णपणे जखडलेले आहेत. म्हणजेच आज भारत प्रदुषणाचे माहेरघर झाल्याचे संपूर्ण चित्र दिसून येते. जगातिल प्रदुषणाच्या बाबतीत तुलना केली तर भारत प्रथम क्रमांकावर असुन यात ३९ शहरे आहेत.तर दुसऱ्या क्रमांकावर चीन असुन ३० शहरे प्रदुषणाच्या बाबतीत अव्वल आहेत.त्या खालोखाल पाकिस्तान -९, बांगलादेश -५,ईरान-३, दक्षिण आफ्रिका -३, नेपाल -२, इंडोनेशिया -२ व इतर देशांतील ७ शहरे याप्रकारे "एस एंड पी ग्लोबल मोबिलिटी वेब प्रेझेंटेशन" या जागतिक संस्थेने नुकतीच १०० प्रदुषित शहरांची सुची जाहीर केलेली आहे यात भारताची चिंताजनक परिस्थिती दिसून येते. आज प्रदुषणामुळे दिल्ली गॅसचेंबर बनली की काय असे वाटत आहे.या महाभयानक परीस्थितीत दील्लीवासी "मास्क"चा मोठ्या प्रमाणात वापर करतांना दिसतात. यामुळे असे वाटते की "दील्लीमध्ये मास्क युग आले की काय असे वाटत आहे". संयुक्त राष्ट्राने १९७२ ला पर्यावरण संरक्षण करण्याची संकल्पना जाहीर केली होती. परंतु याबद्दल कीती देश अलर्ट मोडवर आहेत हे पहाने गरजेचे आहे. पर्यावरण संरक्षण करण्याची घोषणा करणे वेगळे आहे. परंतु त्याला कृतित कोणता देश रूपांतरित करतो त्याला जास्त महत्त्व आहे. कारण आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.त्यामुळे मानवजातीने आपल्या मृत्यूचीही व्यवस्था केल्याचे दिसून येते.मानवजातीने आता पर्यावरण वाचवीले नाही तर पृथ्वीचा विनाश अटळ आहे. याकरीता जगातील संपूर्ण देशांनी विश्व पर्यावरण संरक्षण दीवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला पाहिजे. वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात झाली तर पर्यावरण संतुलित रहायला मोठी मदत मीळेल. त्याचप्रमाणे पर्यावरण संरक्षणाकरीता लोकसंख्येवर नियंत्रण असते गरजेचे आहे, वाढते शहरीकरण थांबवीले पाहिजे, कारखान्यांतील धुळ व दुषीत पाणी यांचा बंदोबस्त केला पाहिजे, भारतासह जगात अनेक वाहन दुषीत धुर ओकत असतात ते कुठेतरी थांबवीले पाहिजे.आज पर्यावरण विस्कळीत झाल्यामुळे व प्रदुषणामुळे मानवजातीवर अनेक आजारांचे संकट ओढावले आहे यात कॅन्सर, टीबी, मधुमेह,हार्ड अटॅक इत्यादीसह अनेक मोठे आजार मोठ्या प्रमाणात दीसुन येतात. आज भारत मोठ्या प्रमाणात प्रगतीपथावर आहे. परंतु पर्यावरणाच्या बाबतीत मागे असल्याचे दिसून येते. याचे जीवंत उदाहरण म्हणजे "दील्लीतील प्रदुषण". त्यामुळे भारताने खासकरून पर्यावरण संरक्षणासाठी युध्दपातळीवर कार्य करण्याची गरज आहे.गेल्या ५ ते १० वर्षांपासून जगात अनेक महाप्रलय, मोठ्या प्रमाणात सुनामी,ग्लेशीअर वितळने, अती पाऊस, अती उष्णता,अती थंडी, मोठ-मोठे जंगल वनवा लागुन जळुन खाक होने ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने व पर्यावरणाची हत्या केल्याने ह्या घटना घडल्याचे स्पष्ट दीसुन येते. त्यामुळे आज पर्यावरणाला वाचविण्याकरिता जगातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. भारतात शहरांचे सौंदर्यकरन करण्याच्या उद्देशाने जंगल तोड करने बरोबर नाही. त्यामुळे भारत सरकारने जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे.यामुळे पर्यावण शुद्ध राहिल. पर्यावरन संरक्षण दिनाच्या निमित्ताने मी सरकारला एकच आव्हान करतो की जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे व ओसाड जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करायला पाहिजे. त्याचप्रमाणे जनतेला मी एकच आव्हा करतो की २६ नोव्हेंबर पर्यावरण संरक्षण दिवसाचे औचित्य साधून या दिवशी प्रत्येकाने आपल्या घरासमोर एकतरी झाड लावावे जागा नसेल तर एखाद्या कुंडीत झाड लावावे व पर्यावरणाचे संरक्षण करावे. त्याचप्रमाणे सरकारने "घर तीथे झाड" ही मोहीम राबविली पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे "गुरांना चारा, पक्षांना फळ व मानवाला सावली मिळेल "यांच्या संगमाने शुध्द हवा मिळुन पर्यावरणात आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. आज संपूर्ण जगाला पर्यावरण वाचवीण्याची हीच संधी आहे ही संधी गमावून नये असे मला वाटते. आज पर्यावरण प्रदुषीत झाल्यामुळे नदी, नाले, तलाव, समुद्र प्रदुषीत झाले आहे. यामुळे जलचर प्राण्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची जबाबदारी विश्वातील संपूर्ण मानवजातीवर आहे त्या हेतुने सर्वांनी पावुले उचलली पाहिजे. पर्यावरण सुरक्षीत तर पृथ्वी सुरक्षीत, पृथ्वी सुरक्षीत मानव, पशु-पक्षी सुरक्षीत हेच धेय्य पुढे ठेवून पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे. आजच्या अत्याधुनिक युगात "मोबाईल टॉवर" मोठ्या प्रमाणात दीसुन येते यामुळेसुध्दा पर्यावरणावर व पशुपक्षांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतांना दिसतो. यावरसुध्दा नियंत्रण आणन्याची गरज आहे. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९३२५१०५७७९, नागपूर

## प्रबोधन

# बुद्ध नवी नीति सर्वांसाठी देती

जगातून मानवी समाजाचं अस्तित्व नष्ट होऊ नये, म्हणून जगाच्या इतिहासात पहिली युद्धविरोधी चळवळ उभी करणारे दोन थोर महात्मे एकाच शतकात जन्मले. ह्यातील पहिला महापुरुष होता, पॅलेस्टाईनचा ज्यूवंशीय प्रेषित जेरिमिया आणि दुसरे होते, भारतीय महापुरुष गौतम बुद्ध! ही घटना आश्चर्यकारक निश्चित आहे. पण त्यांच्या जीवनकाळानंतर जगभर राज्यसत्ता आणि धर्मसत्तेने महात्मा जेरेमियांचा किंवा तथागत गौतम बुद्धांचा शांती संदेश दुर्लक्षित करून करोडो माणसांचं रक्त सांडून आपला राक्षसीपणा, रानटीपणा व्यक्त करावा, हा अमानुष हृदयविदारक प्रकार आहे! आज मात्र अवघं जग अणूयुद्धाच्या भीषणतेने भयभीत होऊन नाक मुठीत धरून युद्धविरोधी चळवळ उभारून जेरिमियांचं नाव घेत, गौतम बुद्धांचं स्मरण करीत त्यांच्या चरित्रातून, संदेशातून धडा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणजेच थोर गौतमबुद्ध हे भूतकाळविजयी तर आहेतच, शिवाय ते भविष्यकाळविजयीसुद्धा असणार आहेत. म्हणूनच आचार्य स. ज. भागवत म्हणतात, 'ज्ञानकोशकार केतकरांनी जगाचं कालमापन करताना बुद्धपूर्व जग व बुद्धोत्तर जग असे दोनच भाग पाडले, ते यथार्थ आहेत. कारण गौतमाच्या पूर्वी एवढा मोठा ऐतिहासिक पुरुष दुसरा आढळत नाही.'

जर आज युद्ध नको या निष्कर्षापर्यंत जग आलं; तर प्रत्येक देश शस्त्रनिर्मिती, शस्त्रास्त्र संशोधन, स्वयंचलित शस्त्रशोध, अधिक संहारक बॉम्बनिर्मिती, शस्त्रास्त्र खरेदी, सैन्यवृद्धी, युद्धवीरसन्मान, संरक्षणासाठी खास आर्थिक तरतूद, अशा हिंसाधिष्ठित उपक्रमापुढे मान का झुकवत आहे? प्रत्येक सुधारलेल्या देशात युद्ध ही अत्यंत लोकप्रिय कलांपैकी एक, असं अद्यापि का मानलं जातं? अजूनही आपण नेमबाजी हा क्रीडाप्रकार मानण्याइतके हिंस्र का आहोत? युद्धात जास्त माणसं मारणारा परमवीर की परमराक्षस ? डॉ.हेन्री थॉमस म्हणतात, 'मानवाच्या बत्थड मेंदूला हिंसा म्हणजे मूर्खपणा आहे, ही गोष्ट कळायला आणखी पन्नास हजार वर्षं लागतील.' ते पुढे म्हणतात, 'इतिहास आपणास हेच शिकवतो की, युद्ध म्हणजे खूनच नव्हे, तर आत्महत्याही आहे. प्रत्येक आक्रमक राष्ट्र शत्रूचा नाश करता करता स्वतःही नष्ट झालं आहे.' या पार्श्वभूमीवर अहिंसेचा संदेश देणारे गौतमबुद्ध हे जगाचा उद्धार करणारे एकमेव सार्वकालिक महापुरुष सिद्ध होतात.

भारत हा प्राचीन देश आहे. त्याचा इतिहास प्राचीन आहे. या देशातील शोषणजीवी शास्त्रीपंडित तर धन्य भारते जन्मः म्हणून रात्रंदिवस धन्योद्गार काढत असतात. पण स्वामी विवेकानंद परखडपणे सांगतात, 'बुद्धदेवाच्या पूर्वी होतं, तरी काय या देशात? भूर्जपत्रांच्या पोथ्यांतील काही धर्मतत्त्वं! तीही निवडक लोकांना माहीत असलेली! बुद्धांनी ती सर्वांसाठी खुली केली. ती जीवनात कशी उतरावयाची, ते दाखवलं! एका अर्थी बुद्धच वेदांताची स्फुरणमूर्ती होते.'

मध्ययुगीन संतसाहित्य सत्य, अहिंसा, सहिष्णुता, करुणा, प्रेम या तत्त्वांनी समृद्ध झालं, ते बुद्धांच्या प्रभावाने. डॉ.हेन्सी थॉमस म्हणतात, 'बुद्धधर्मी माणूस म्हणजे पृथ्वीवरचा अत्यंत सहिष्णू प्राणी होय. इतर धर्मीयांप्रमाणे बुद्ध धर्माने कधी रक्त सांडलं नाही किंवा कोणाचा छळ केला नाही.' वारकरी संप्रदायातील संतवाङ्मय अहिंसा परमो धर्म असं मानणारं आहे, त्यामागे बुद्धांच्या अहिंसाप्रेमाची प्रेरणाच आहे.

गौतम बुद्ध देव वा ईश्वर मानत नव्हते, पण त्यांच्या भक्तांनी त्यांचाच देव, ईश्वर केला, ही वस्तुस्थिती आहे. ते आत्म्याचं अस्तित्व मानत नव्हते; पण त्यांच्या जातककथा लिहिल्या गेल्या. स्वामी विवेकानंद लिहितात, 'बुद्ध असे एकमेव महापुरुष होते की, ज्यांचं म्हणणं होतं, मी तुमचा तो ईश्वरासंबंधीच्या सिद्धान्ताचा काथ्याकूट ऐकू इच्छित नाही. आत्म्यासंबंधीचा कीस काढण्यात काय अर्थ आहे? चांगलं कर्म करा आणि चांगलं व्हा. तेच तुम्हाला आनंद देईल!'

बुद्धांनी निरीश्वरवादी विचारधारा प्रवाहित केली. याबद्दल डॉ. थॉमस लिहितात, 'प्रथम त्यांनी भटाभिक्षुकांचं बंड त्यांनी मोडलं. ते विधी, ते यज्ञ, त्या भ्रामक रूढी या सर्वांच्या मुळावर बुद्धांनी घाव घातला. देवाचे सेवकही त्यांनी दूर केले आणि देवही दूर सारले.'

भारतीय सनातनी शास्त्रीपंडित धर्मतत्त्वं लोकांपासून लपवून ठेवीत. पण बुद्ध म्हणतात, 'मी नेहमी सत्य उपदेशिलं. सत्यामध्ये गुप्त सत्य आणि प्रकट सत्य असे भेद मी केले नाहीत.' लोकांना ते सांगत, 'पोथ्यापुराणं, वाडवडिलांचं सांगणं किंवा ऐकीव गोष्टी कशावरही विश्वास न ठेवता सारासार विचार करून सर्वांसाठी हितकारक असेल त्या गोष्टीवर विश्वास ठेवा आणि त्याप्रमाणे वागा. इतरानांही तसंच वागण्यासाठी मदत करा!'

बुद्धांचा हा लोकभाषेतील उपदेश जीवनाला साधं, सोपं, सरळ स्वरूप देणारा असल्यामुळेच अमाप लोकप्रिय झाला. गौतम बुद्ध प्रेमतत्त्वाचे आद्य प्रवर्तक होते आणि आजन्म प्रसारकही होते. आचार्य स. ज. भागवत म्हणतात, ह्यमाणसाच्या जीवनाचं साफल्य त्याच्या हृदयाचा किती विकास झाला, यावर अवलंबून आहे. हृदयाची उदारता विकसित करण्यावरच जीवनाचं साफल्य आहे. बुद्धांनी मानवाच्या रूक्ष जीवनाला रसपूर्ण केलं.' मराठीत पहिलं 'बुद्ध चरित्र' १८९८मध्ये इतिहासकार कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी लिहिलं होतं. १९०७मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅट्रिक पास झाल्यावर केळुसकरांनी त्यांना हे 'बुद्धचरित्र भेट' दिलं. डॉ. आंबेडकरांच्या जीवनात तो क्षण क्रांती करणारा ठरला. जवळजवळ दोन हजार वर्षं बुद्धांच्या शिकवणीचा निम्म्या मानवजातीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम होत आहे. आता उरलेली निम्मी मानवजातही बुद्धांची ती वाणी ऐकायला तयार होत आहे. थोर विचारवंत डॉ. आ.ह. साळुंखे बुद्धांविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात, सूर्य होता आलं नाही तर सूर्यफूल व्हावं! मस्तक त्याच्याकडं असावं ! बुद्ध होता आलं नाही तरी बुद्धफूल व्हावं, हृदय त्याच्याकडे असावं, त्याच्या स्फूर्तीत जगावं !!-हे मार्गदर्शन जगणं आदर्श करणार आहे. कारण -

तथागत बुद्ध । जन्मले पृथ्वीवर ।
स्वर्गाहून सुंदर । जग झाले ॥ १
कोटी देवाहून । बुद्ध थोर होते।
माणसांचे होते । श्रेष्ठ भक्त ॥ २
अहिंसेचा मंत्र । दिला संजीवक ।
हिंस्रतेचा धाक । दूर केला ॥३
व्हावे चिरंजीवी । मानवी जीवित।
म्हणूनी चिंतित । झाले बुद्ध ॥४
युद्धप्रेमी जगा। शिकविली शांती।
अहिंसक क्रांती । तिचे नाव ॥ ५
'जगा नि जगू द्या' । आग्रह करती।
बुद्ध नवी नीती । देती सर्वां ॥६
शांती सहिष्णुता । हाच खरा धर्म।
अस्तित्वाचे मर्म । गौतमोक्त ॥७
आत्मा-परमात्मा । बुद्ध नाकारती ।
नव्या युगी नेती । जुन्या युगा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# ८.२४ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.२४ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची परतफेड दि. २३ डिसेंबर, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. २४ डिसेंबर, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

'परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१' अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. २४ डिसेंबर २०२४ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबंधित तपशिलासह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/ त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.२४ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस 'प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली.', असे यथोचितरित्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केलें जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे. रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोकऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणा-या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाव्दारे त्याचे प्रदान करील, असे वित्त विभागाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

## वात्रटिका

### विश्लेषण आणि भूषण

हारणे जिंकणे झाले
आता सुरू परिक्षण...
जिंकलेल्या भावाचे
बहिणीकडून औक्षण...
का झाले असावे असे
यांचे चालू आहे विश्लेषण...
घासून का असेना आले
याचे वाटते भूषण...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# ट्रम्पेटनं डाव साधला, शरद पवारांच्या पक्षाला तब्बल 9 जागांवर फटका

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे बहुमत मिळाले. निकालानंतर आता महायुतीमध्ये सत्तास्थापनेसाठी हालचाली वाढल्या आहेत. मुख्यमंत्रिपद कोणाकडे द्यावे, याबाबत महायुतीतील मित्रपत्रांमध्ये चर्चा चालू आहे. तर दुसरीकडे राज्यातील जनतेने महाविकास आघाडीकडे पाठ फिरवलीआहे. शरद पवार, उद्धव ठाकरे तसेच काँग्रेसला जनतेने नाकारले आहे. दरम्यान, या निवडणुकीतील निकालाचे विश्लेषण केले जात असताना अचंबित करणाऱ्या बाबी समोर येत आहेत. ताज्या अभ्यासानुसार तुतारी (ट्रम्पेट) या निवडणूक चिन्हामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला जवळपास 9 जागांवर फटका बसला आहे.

### आकडेवारी काय सांगते?

विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह तुतारी फुंकणारा माणूस असे होते. याच निवडणुकीत अनेक जागांवर तुतारी (ट्रम्पेट) असे चिन्ह असलेले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. तुतारी या नावामुळे अनेक जागांवर शरद पवार यांच्या पक्षाला फटका बसू शकतो, असा अंदाज व्यक्तक केला जात होता. त्याची प्रचीती आता आली आहे. शरद पवार यांच्या पक्षाला या निवडणुकीत एकूण नऊ जागांवर फटका बसला आहे. तुतारीला मिळणारी मतं जर शरद पवार यांच्या पक्षाला मिळाली असती तर या नऊ जागांवर राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार विजयी झाले असते, असे बोलले जात आहे.

### कोणकोणत्या जागांवर फटका बसला?

जिंतूर, घनसावंगी, शहापूर, बेलापूर, अणुशक्तीनगर, आंबेगाव, पारनेर, केज, परंडा या जागांवर शरद पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा जेवढ्या मतांनी पराभव झाला आहे, त्यापेक्षा अधिक मतं तुतारी हे निवडणूक चिन्ह असलेल्या उमेदवारा मिळाली आहेत.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर जिल्ह्याचा पालकमंत्री कोण?

## सुभाष देशमुख, विजय देशमुख की सचिन कल्याणशेट्टी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर आता कोण कोण मंत्री होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. सोलापूर जिल्हा हा या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस मुक्त झाल्याचे पाहायला मिळाले. भारतीय जनता पार्टीचे तब्बल पाच आमदार जिल्ह्यात निवडून आले आहेत.

सलग पाच वेळा आमदार होण्याचा मान विजयकुमार देशमुख यांनी मिळवला असून त्यानंतर सलग तीन वेळा सुभाष देशमुख हे आमदार झाले आहेत आणि सलग दोन वेळा अक्कलकोटचे सचिन कल्याणशेट्टी आणि मंगळवेढ्याचे समाधान आवताडे ते आमदार झाले आहेत.

यापूर्वी आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख यांना मंत्रिपद मिळाले होते. आता या दोघांमध्ये भाजप कोणाला मंत्री करते याची उत्सुकता आहे. दरम्यान मुंबईतील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्यात दोन मंत्री पदे मिळणार आहेत. एक कॅबिनेट आणि दुसरा राज्यमंत्री. त्यामुळे आता सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख आणि सचिन कल्याणशेट्टी या तिघांपैकी कोणाच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडणार याची उत्सुकता आहे.

पण दोन्ही देशमुख आमदार हे ज्येष्ठ आहेत. त्या दोघांनाही मंत्रिपद मिळणार की, या दोघांपैकी एकाला संधी मिळणार तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या अतिशय निकटवर्तीय मानले जाणारे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना सुद्धा मंत्रिपदाची लॉटरी लागण्याची शक्यता आहे. गेल्या पाच वर्षात परका पालकमंत्री सोलापूर जिल्ह्याला मिळाला परंतु यंदा हक्काचा पालकमंत्री मिळणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याचा पालकमंत्री आता कुणाच्या रूपात पाहायला मिळतोय हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# कवयित्री शेख यांना काव्य सम्राज्ञी पुरस्कार

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील पुर्व भागातील गणेशगांव येथील कवयित्री नूरजहाँ फकरूद्दीन शेख यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंचाच्या वतीने काव्य सम्राज्ञी पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. त्यामुळे माळशिरस तालुक्यात साहित्य क्षेत्रात सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच महाराष्ट्र रत्नागिरी शाखा पुणे जिल्हा यांच्या वतीने आयोजित केलेल्या उपक्रमात नूरजहाँ शेख यांनी कविता पाठवली होती.त्यांचा कवितेतील उत्कृष्ट लिखाणाबद्दल काव्य सम्राज्ञी पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.त्यामुळे नूरजहाँ शेख यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्या ग्रामीण भागातील महिला कवयित्री आहेत त्यांनी कविता लिखाणाचा छंद जोपासला आहे. त्यांचे हिंदी व मराठी भाषेतून कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या उत्कृष्ठ लेखणी ला काव्य सम्राज्ञी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला मनोज जाधव (संस्थापक अध्यक्ष) भावना खोब्रागडे (सहसंस्थापिका संपादिका) जयद्रथ आखाडे (कार्याध्यक्ष पुणे) अल्पेश सोनवणे (ग्राफिक्सकार पुणे जिल्हा) यांनी त्यांच्या लेखणीस पुरस्कार दिला आहे.



कवयित्री नूरजहाँ शेख यांचे प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण माळीनगरच्या दि मॉडेल विविधांगी प्रशालेत झाले आहे.पदवी पर्यंतचे शिक्षण अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात झाले आहे तर उच्च पदवीत्तर शिक्षण पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात झाले आहे.

# गुळपोळी मध्ये कालभैरव जयंती भक्ती भावाने साजरी

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** गुळपोळी येथील श्री कालभैरव मंदिरामध्ये मंगळवारी श्री कालभैरव जयंती मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली.



जयंती उत्सवानिमित्त श्री कालभैरव मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते व भैरवनाथ जयंती निमित्त शनिवारी पहाटेपासून अभिषेक वगैरे धार्मिक कार्यक्रम सुरू होते. देवाची पुजा व दु १२:०० काल्याच्या किर्तनाने सांगता झाली ह.भ.प इगळे महाराज सोलापूर कर यांचे किर्तन झाल्यानंतर भक्तांना सौ वंदना रामचंद्र उबाळे व समस्त देणगीदार व गावकरी यांचे वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

श्री कालभैरव जयंतीनिमित्त स्वरूप दर्शन मुर्तीचे उद्घाटन पुजारी बबुदादा गुरव व रामचंद्र बापूराव उबाळे यांचे हस्ते करण्यात आले. गुळपोळीसह बार्शी तालुक्यातील पंचक्रोशीतील सर्व समाज बांधव आणी भक्तांनी जयंती उत्सवासह देवदर्शन व प्रसादाचा लाभ घेतला.श्री कालभैरव अन्नदान व नवरात्र उत्सव मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत गोविंद चिकणे यांनी जयंती उत्सवाच्या आयोजनाबद्दल प्रसिद्धी माध्यमांना माहिती दिली.

श्री कालभैरवनाथ जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन श्री कालभैरव अन्नदान व नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने आयोजिन करण्यात आले होते. श्री भैरवनाथ जयंती चा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत गोविंद चिकणे, उपाध्यक्ष राजेंद्र अभिमान चिकणे, कार्याअध्यक्ष, लक्ष्मण मधुकर मचाले, उपकार्यअध्यक्ष राहूल मोहन मचाले, सेक्रेटरी राजेंद्र मचाले, उपसेक्रेटरी शहाजी चिकणे, खजीनदार हनुमंत लक्ष्मण पाटील, उपखजीनदार परमेश्वर लक्ष्मण मचाले, व अतुल सूर्यकांत चिकणे, शिवाजी सूर्यकांत चिकणे, प्रेम परमेश्वर मचाले, यश भैरवनाथ पवार, घनश्याम चिकणे, परमेश्वर चिकणे, राया सावंत, औदुंबर सावंत, महेश मचाले, काका पाटील, महेश चिकणे, रवि सावंत, अमोल सावंत, आदींसह व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परीश्रम घेतले. जयंती उत्सवानिमित्त संध्याकाळी दिपोत्सव साजरा करण्यात आला व दुपारी १२:०० वाजल्यापासून सायंकाळी ९:०० वाजेपर्यंत अन्नदान करण्यात आले व श्री कालभैरव जयंती कार्यक्रमाची सांगता झाली.

# पोलिसांना धक्काबुक्की; आठ आरोपींना बेड्या

**अकोला (कटूसत्य वृत्त):-** अकोला पश्चिम मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार साजीद खान पठाण यांच्या विजयाचा जल्लोष सुरू असताना माळीपुरा चौकात बंदोबस्तात असलेल्या रामबहादूर चव्हाण या पोलिस कर्मचाऱ्यासोबत वाद घालणाऱ्या आठ युवकांना अटक करण्यात पोलिसांना यश आले. यामध्ये मुख्य आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने अटक केल्यानंतर इतर सात आरोपींना रामदासपेठ पोलिसांनी रविवारी अटक केली.




साजीद खान मन्नान खान पठाण यांना विजयी घोषित केल्यानंतर काही युवकांनी माळीपुरा चौकात जल्लोष केला. यावेळी बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याला काही युवकांनी धक्काबुक्की करीत वाद घातला. पोलिस कर्मचारी एकटेच असल्याने या युवकांनी पाठलाग करून त्यांना चिथावणीही दिल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणी संबंधित पोलिस कर्मचाऱ्याने रामदासपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपींची धरपकड सुरू करण्यात आली.

सीसीटीव्ही फुटेज आणि माहितीवरून आठ आरोपींना अटक करण्यात आली असून, आणखी आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलिस अधीक्षक अभय डोंगरे, शहर पोलिस उपअधीक्षक सतीष कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मनोज बहुरे, गणेश नावकर, प्रदीप जोगंदड, नीलेश गायकवाड, सुरेश मोरे, अतुल बावणे, दिनकर चौधरी, विलास सावे, सुमित पाली, कांताराम तांबळे, वर्षा पाथळे यांनी केली.

# जिल्ह्यातील मतमोजणी मधील आकडेवारीत तफावत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक झ 2024 च्या मतमोजणीचा निकाल दिनांक 23 नोव्हेंबर 2024 रोजी जाहीर झाला. त्याअनुषंगाने राज्यातील विविध मतदार संघात निवडणुकीसाठी प्रत्यक्ष झालेले मतदान आणि मतमोजणी दिवशी ईव्हीएम मध्ये आलेले आकडे यात तफावत असल्याची बाब राज्यातील विविध वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे निर्देशनास आले आहे. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील 244-करमाळा, 245- माढा, 249—सोलापूर शहर मध्य, 251- सोलापूर दक्षिण या मतदार संघामध्ये मतदान व मतमोजणी मधील आकडेवारीत तफावत दिसून आली. त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे.

244- करमाळा या विधानसभा मतदारसंघामध्ये मतदानादिवशी 2 लाख 29 हजार 375 अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी 2 लाख 29 हजार 377 अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये 2 मताची वाढ ही केंद्राध्यक्ष केंद्र क्र.115 यांनी नमुना 17 सी मध्ये मतांचा हिशोब लिहीताना चुकीची नोंद घेतल्याने झाली. सदरची मानवीय चुकीमुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अहवालामध्ये तफावत दिसून येते.

245-माढा या विधानसभा मतदारसंघामध्ये मतदानादिवशी 2 लाख 67 हजार 691 अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी 2 लाख 67 हजार 21 अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये 670 मताची घट आढळून आली. सदरील बाब ही केंद्र क्र.149 केंद्राध्यक्ष यांनी मॉकपोल वेळी नोंदवलेली मते उप्ध न केल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे हस्त पुस्तिकामधील तरतुदीनुसार निवडून आलेल्या उमेदवाराची मतांची तफावत ही सदर केंद्रावर नोंदवण्यात आलेल्या मतापेक्षा अधिक असल्यामुळे सदर केंद्राची 670 मते मतमोजणी दिवशी मोजली नाहीत त्यामुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अहवालामध्ये तफावत दिसून येते.

249-सोलापूर शहर मध्य या विधानसभा मतदारसंघामध्ये मतदानादिवशी 2 लाख 291 अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी 2 लाख 289 अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये 2 मताची घट आढळून आली. सदरील बाब ही केंद्राध्यक्ष केंद्र क्र.197 यांनी केंद्राध्यक्ष दैनंदिनीमध्ये 2 प्रदत्त मते ईव्हीएम मतांच्या हिशोबात गृहीत धरल्याने 665 मते नमुद केली तथापि मततोजणीच्या दिवशीच्या ईव्हीएम मध्ये 663 मते आढळून आली. सदरील मानवीय लेखन चुकीमुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अहवालामध्ये तफावत दिसून येते.

251-सोलापूर दक्षिण या विधानसभा मतदारसंघामध्ये मतदानादिवशी 2 लाख 23 हजार 624 अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी 2 लाख 23 हजार 625 अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये 1 मताची वाढ दिसून आली. सदरील बाब केंद्राध्यक्ष यांनी 1 ईलेक्शन ड्युटी सर्टिफिकेट चे मत गृहीत न धरल्यामुळे 676 मते असा हिशोब केंद्राध्यक्ष दैनंदिनीमध्ये नमुद केला. त्यामुळे मतमोजणीच्या दिवशी ईव्हीएम मध्ये 677 मते आढळून आले. सदरील मानवीय लेखन चुकीमुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अहवालामध्ये तफावत दिसून येते. अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

# हंगाम बदल, कांदा चाळ अर्थकारणाला चालना मिळेना

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात कांदा लागवडीचे क्षेत्र सातत्याने वाढत आहे. मात्र, खरिपाच्या वेळी घेतलेल्या कांदा लागवडीचे प्रमाण अधिक असल्याने उत्पादकांना साठवण न करता मिळेल त्या भावाने कांदा विकावा लागतो आहे. मात्र रब्बी हंगामात कांदा घेणे व कांदा चाळ तंत्राचा वापर करणे या दोन्ही गोष्टीमुळे कांदा उत्पादकांचा अर्थकारण बदलणे शक्य होणार आहे. जिल्ह्यात सातत्याने कांदा लागवडीचे क्षेत्र वाढत आहे. मात्र, हे क्षेत्र खरीप काळातील असल्याने त्याचे अर्थकारण उत्पादकांना पुरेसे फायदेशीर ठरत नाही. कारण उत्पादित कांदा थेट मिळेल त्या भावाने विकावा लागतो. या कांद्याची साठवणूक देखील केली जात नाही. मात्र त्या तुलनेत रब्बी हंगामातील कांद्याचे अर्थकारण अधिक मजबूत आहे. रब्बीत निघालेला कांदा जूनपर्यंत कांदा चाळीत साठवला जातो. पावसाळ्यात कांद्याचे भाव वाढत असल्याने या स्थितीचा फायदा उत्पादकांना मिळतो. जिल्ह्यातील उत्पादकांनी कांदा अर्थकारणाच्या मुख्य प्रवाहाशी जोडून घेणे गरजेचे आहे.

पाावसाळ्यामध्ये आर्द्रता ९५ टक्क्यापर्यंत असते. पाऊस सुरू असतानाची ही अति उच्च आर्द्रता साठवलेल्या कांद्याच्या ढिगामध्ये असलेल्या पोकळीमध्ये शिरते. यामुळे तसेच पावसाळ्यातील पोषक तापमानामुळे ढिगामध्ये साठवलेल्या कांद्यास कोंब येतात व कांदे खराब होतात. कांदाचाळीने हे नुकसान टाळून चांगला भाव मिळेपर्यंत साठवण करता येते.

**काय आहेत अडचणी**

- सध्या राज्यात कांदा उत्पादनापैकी खरिपामध्ये ४० टक्के तर रब्बी व उन्हाळी हंगामामध्ये ६० टक्के उत्पादन
- सोलापूर जिल्ह्यात मात्र खरीप कांद्याचे क्षेत्र अधिक
- कांदा साठवणूक तंत्राचा म्हणजे कांदा चाळीचा उपयोग नाही
- असेल त्या भावात कांदा विक्री करण्याची वेळ
- रब्बी हंगामातील कांदा पावसाळ्यामध्ये (जून-ऑक्टोबर) सर्वोच्च भावावर विकण्याची संधी

**जाहीर प्रसिद्धीकरण**

जन्म - मृत्यु नोंद अर्ज नं.३५०/२०२४

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

सुनीता भीमा जमदाडे, वय-सज्ञान वर्षे, धंदा-शेती, रा. वाघोली ता. मोहोळ, जि. सोलापूर. }अर्जदार

विरूध्द

ग्रामसेवक ग्रामपंचायत, वाघोली. ता.मोहोळ जि.सोलापूर }सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदारांनी यात अर्जदार यांची मुलगी दीक्षा भीमा जमदाडे हिचा जन्म मौजे वाघोली ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झालेला आहे त्यांच्या जन्माची ची नोंद करण्यासाठी दाखला मिळण्यासाठी या कोर्टात वरील प्रमाणे अर्ज केला आहे.

त्या अर्थी वरील मागणी बाबत जर कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात सदर प्रसिध्दिकरण झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा मे. कोर्टानी नेमलेले १४/१२/२०२४ रोजी हजर होवून स्वतः अथवा प्रतिनिधी मार्फत त्यांचे म्हणणे सादर करावे, जर मुदतीत कोणाची काही हरकत, न आल्यास अर्जदाराचे मागणीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल.हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे ता.०४/११/२०२४

(शिक्का)

हुकूमावरुन
न्यायालय अधिक्षक
तहसीलदार कार्यालय मोहोळ

**जाहीर प्रसिध्दीकरण** नि.७, दि.कि.अर्ज नं.४२/२०२४

**मोहोळ येथील सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात.**

१) श्रीधर अनंत जोशी
२) शकुंतला मल्हार कुलकर्णी } अर्जदार

विरूध्द

कोणी नाही..... } सामनेवाला

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वर नमुद अर्जदार नं. १ व २ च्या सख्ख्या बहिणी म्हणजेच दुर्गा अनंत जोशी ही दि. १४/०५/१९८२ रोजी मौजे पंढरपूर जि. सोलापूर येथे व इंदु अनंत जोशी ही दि. ०३/०१/२०१३ रोजी मौजे पुणे येथे मयत झाल्या आहेत. अर्जात नमुद केल्याप्रमाणे मौजे खंडाळी, ता. मोहोळ येथील शेतजमीन गट नं. ७२७ च्या ७/१२ उताऱ्यावर मयत कै. दुर्गा अनंत जोशी व कै. इंदु अनंत जोशी यांचे नाव कमी होवुन अर्जदार नं. १ व २ हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत असे जाहिर होवुन त्यांचे नांवे वारसा प्रमाणपत्र (दाखला) देवविण्याचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. ०२/०१/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.२२/११/२०२४

सही/- क.लिपीक
ज्यु. मॅ. वर्ग-१ सो, मोहोळ

(शिक्का)

सही /- सहाय्यक अधिक्षक
ज्यु. मॅ. वर्ग-१ सो, मोहोळ

# माढा, वाकावमध्ये प्रा. तानाजीराव सावंतांचा विजय उत्सव

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्याचे सुपुत्र राज्याचे आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी भूम-परांडा विधानसभा मतदारसंघात चुरशीच्या लढतीत सलग दुर्सयांदा विजय संपादन केला. त्यांच्या विजयानंतर माढा व वाकाव येथे कार्यकर्त्यांनी आतषबाजी व गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. आरोग्यमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी गत विधानसभेत याच मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने विजयी झाले होते. यंदा सावंत यांची शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल मोटे यांच्याशी लढत झाली. यामध्ये सावंत विजयी झाले. सावंत विजयी झाल्याचे कळताच माढा येथे शिवसेनेच्या संपर्क कार्यालयासमोर तोफांची आतषबाजी करण्यात आली. मंत्री सावंत यांचे मूळगाव असलेल्या वाकाव येथील ग्रामस्थांनी जयवंत बंगला येथे शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांच्या समवेत आतषबाजी करून गुलालाची उधळण केली. यावेळी कालिदास सावंत, युवानेते पृथ्वीराज सावंत, सरपंच ऋतुराज सावंत, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मुन्ना साठे, नगरसेवक अरविंद खरात, महातपूरचे माजी सरपंच सम्मेद सावळे, बालाजी बारबोले, निमगावचे सरपंच धर्मराज मुकणे, अजिंक्य काटे, संजय ढेरे यांचेसह वाकाव ग्रामस्थ व शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



**Classified - छोटी जाहीरात**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**यात्रा**

उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर

**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.

**संपर्क:**
9881361260

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**

|| श्री अनगरसिद्ध प्रसन्न ||

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**

इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...



- बांधकाम नकाशा
- इंटेरियर डिझाईन
- 3 D डिझाईन
- कॉन्ट्रॅक्टर वर्क्स
- बांधकाम परवाना
- स्टील डिझाईन
- इस्टिमेट
- साईट सुपरव्हिजन
- ब्लु प्रिंटस्
- लेबर सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
ऑफिस :- ग्रामीण रुग्णालयासमोर, तहसिल कार्यालयाजवळ, मेनरोड, मोहोळ
Mo. 9552547272, 8788832033 (Email:swapnil9399@gmail.com)

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)


**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल/व्हॉटस्‌अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट

## कटूसत्य शब्दकोडे क्र. १०९



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण ४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे ८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी १०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** १४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत) १९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे २५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी २७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव ३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया ३२) किमानच्या विरूध्दार्थी ३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको ४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट ४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष ४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच ५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

**शब्दकोडे क्र. १०८ चे उत्तर**



**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# पराभवानंतर २४ तासाच्या आत यशवंत माने ॲक्शन मोडवर



**कारंबा (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीत पराभवला सामोरे जावे लागलेल्या माजी आमदार यशवंत माने यांनी खचून न जाता २४ तासाच्या आत मोहोळ व उत्तर सोलापूर तालुक्यातील २४ गावांतील कार्यकर्त्यांच्या गाठीभेटीचे सत्र सुरु केले. खचून जाऊ नका, प्रोटोकॉल म्हणून मी आमदार नसलो तरीदेखील आमदार असताना जेवढे काम केले तेवढे काम जोमाने करेन पाच वर्षे मतदारसंघात सेवेत तत्पर राहून विकास निधी खेचून आणेन, अशी ग्वाहीही त्यांनी दिली..

मतमोजणीच्या निकालानंतर कार्यकर्त्यांनी माने यांच्या भेटीसाठी शनिवारी इंदापूरचा रस्ता धरला.तेव्हा तुम्ही कोणीही यायची तसदी घेऊ नका, मीच तुमच्या भेटीला येतो, असे सांगून निकाल लागून २४ तास होण्यापूर्वीच माने यांनी रविवारी कार्त्यकर्त्यांच्या गाठीभेटी घ्यायला सुरुवात केली. मोहोळ, अनगर नंतर मार्डी येथे तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), भारतीय जनता पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची वैठक घेतली. अविनाश मातंर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस सुवर्णा झाडे, जिल्हाध्यक्षा वषार्राणी शिंदे, कार्याध्यक्षा उज्ज्वला पाटील, एस.पी. काळे, संभाजी भडकुंबे, सरपंच उमेश भगत, सुनील भोसले, प्रकाश चोरेकर, दाजी गोफणे, शिवाजी पाटील, तात्या मगर, हरिभाऊ घाडगे, श्याम शिंदे, सौदागर पवार, आतिक काझी, तानाजी पवार, संग्राम डोके, विशाल कांवळे, गोपाळ मसलखांव, अरुण मुडके, रेवणसिध्द कापसे, अंकुश खेलवुडे, विनायक सुतार, नानासाहेव पवार, जगन्नाथ भोरे, दशरथ पवार, मंजूर शेख, शिवानंद होनमुटे, राजाराम गरड, दयानंद शिंदे, अमोल पाटील, योगेश माळी, चंद्रकांत तोडकर, दीपक झांजले, तुषार साठे, वाळराजे मोहिते, रमेश गाडे, गणेश नागोडे यांच्यासह तालुक्यातील ५०० कार्यकर्ते उपस्थित होते. काहींनी ही चिंतन बैठक असल्याचे सांगितले. मात्र माने म्हणाले, ही चिंतन बैठक नसून हा तर कार्यकर्ता संपर्क दौरा असल्याचे सांगून कार्यकर्त्यांनाच कोणीही खचून जाऊ नका, आपसात मतभेद करु नका पराभवावरून कारण मिमांसा करु नका. २०२९ लाहा मतदारसंघ खुला होईल. मात्र, ज्या पक्षाने मला उमेदवारी देऊन विश्वास टाकला. त्या पक्षाचे पुढील निवडणुकीपर्यंत काम करणे हे माझे कर्तव्य आहे.कोणालाही दवू नका, आमदार विरोधी पक्षातील असला तरीदेखील अविनाश मातंर्डे सोबतीला आहेत. राजन पाटील, शहाजी पवार मोठ्या समितीवर आहेत.सत्ता आपलीच आहे. अजितदादांची राष्ट्रवादी या मतदारसंघात वाढविण्यासाठी आठवड्यातून एक दिवस मी इथेच आहे. २०२९ च्या निवडणुकीपर्यंत रात्रंदिवस तुमच्यासाठी आहे. भागाईवाडी ते तळेहिप्परगापर्यंत २४ गावांच्या विकासासाठी मी कार्यरत आहे. कोणाच्या केसालाही धक्का लागणार नाही. तन-मन-धनासह मी तुम्हा सर्वांसोबत आहे.

# तीस वर्षानंतर मोहोळमध्ये सत्तांतर



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या मोहोळ राखीव विधानसभा मतदारसंघात तब्बल सहा टर्मनंतर परिवर्तन घडले असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजू ज्ञानू खरे यांनी ३० हजार २०० मतांनी विजय मिळविला आहे. त्यांना १ लाख २५ हजार ८३८ मते मिळाली आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान आमदार यशवंत विठ्ठल माने ज्यांना ९५ हजार ६३६ मते मिळाली.आघाडीच्या महाविकास कार्यकर्त्यांनी विजयानंतर मोहोळ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकच जल्लोप करत आनंद व्यक्त केला. अनगर परिसर व उत्तर सोलापूर तालुक्यातील काही भाग सोडला तर प्रत्येक फेऱ्यामध्ये खरे यांना आघाडी मिळत गेली होती. महोळ येथील शासकीय धान्य गोदामात शनिवार, सकाळी ८ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर,सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मुळीक यांच्या देखरेखीखाली मतमोजणीला प्रारंभ करण्यात आला. सुरुवातीला पोस्टल मतांची मोजणी करण्यात आली. यामध्ये २०२६ पोस्टल मतांपैकी ९२ मते अवैध ठरली. राजू खरे यांना १०४९ मते पडली तर यशवंत माने यांना ८२७ मते मिळाली. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये महायुतीचे यशवंत माने पिछाडीवर होते, त्यानंतर तिसऱ्या-चौथ्या-पाचव्या फेरीमध्ये यशवंत माने यांनी मतांची आघाडी मिळवली. मात्र सातव्या फेरीमध्ये राजू खरे यांनी जवळपास ५ हजार मतांची आघाडी घेतली. त्यानंतर शेवटच्या काही फयांपर्यंत ते आघाडीवरच राहिले. उत्तर सोलापूर तालुक्याच्या काही भागात यशवंत माने यांना मताधिक्य मिळाले परंतु राजू खरे यांनी मोहोळ तालुक्यातील मिळविलेले मताधिक्य त्याला छेदू शकले नाही. सोळाव्या फेरीमध्ये राजू खरे यांना २७ हजार ५०० मतांचे मताधिक्य मिळाले. त्यानंतर हजार ते दीड हजारांच्या मतांच्या आकडेवारीमध्ये कमी जास्त प्रमाणात फरक पडत गेला. शेवटच्या चोविसाव्या फेरीमध्ये राजू खरे यांना १ लाख २४ हजार ७८९ मते मिळाली तर यशवंत माने यांना ९४ हजार ८०९ इतकी मते मिळाली. शेवटची फेरी ९ हजार ४३ मतांची होती. त्यामध्ये राजू खरे व यशवंत माने यांना जवळपास समान मते मिळाली.

> विजयाचे श्रेय पीडित जनतेचे मतदारसंघातील असणाऱ्या मोहोळ तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून हुकूमशाही, गुंडगिरी, तानाशाह, मालकशाहीमुळे जनता पीडित होती. गेल्या अनेक वर्षापासून ही जनता अन्याय सहन करत होती.त्यांना यातून मुक्त करण्यासाठी तालुक्यासह मतदारसंघातील सर्व जनता एकवटली. त्यामुळे या विजयाचे सर्व श्रेय मोहोळ तालुक्यातील पीडित जनतेचे आहे. आज खऱ्या अर्थाने मोहोळ तालुक्याच्या स्वातंत्र्याची पहाट उगवली आहे. मागील ३०-४० वर्षापासूनच्या रखडलेल्या विकासाला उद्यापासून प्रारंभ होईल.
>
> **- राजू ज्ञानू खरे**

### विजय संयमाने साजरा करा

> ५० वर्षांची मोहोळ तालुक्यात एकाच कुटुंबाची असलेली एकाधिकारशाही सामान्य जनतेने स्वातंत्र्याचा लढा पुकारून मोहोळ तालुका गुलामगिरीतून मुक्त केला. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. मात्र, तालुक्याचा स्वातंत्र्यदिन २३ नोव्हेंबर २०२४ ही तारीख जनता लक्षात ठेवेल. ज्यांनी आम्हाला मतदान केले त्यांच्याबरोबरच ज्यांनी विरोध केला त्यांच्याबद्दल कोणतीही कटूता न ठेवता तालुक्याच्या व मतदारसंघाच्या विकासासाठी आम्ही काम करणार आहोत. तालुक्यातील अनेक पक्षाच्या नेत्यांनी आपल्या पक्षांची उपरणे बाजूला ठेवून या स्वातंत्र्य लढ्यात उडी मारली. विजय संयमाने साजरा करा. विजयाचा उन्माद करू नका.
>
> **- उमेश पाटील,** माजी मुख्य प्रवक्ता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

विद्यमान आमदार यशवंत माने यांचा राजू खरे यांनी ३० हजार २०२ मतांनी दणदणीत विजय मिळविला. विजयानंतर ज्येष्ठ नेते मनोहर भाऊ डोंगरे, जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, माजी प्रवक्ते उमेश पाटील, माजी सभापती विजयराज डोंगरे, ज्येष्ठ नेते दीपक गायकवाड, जिल्हाप्रमुख सतीश जगताप, चरणराज चवरे, संजय क्षीरसागर, भैय्या देशमुख, काका देशमुख, अशोक भोसले, बाळासाहेब गायकवाड, मानाजी माने, रमेश बारसकर, सीमा पाटील, महेश देशमुख,विकी देशमुख, विक्रांत माने, सत्यवान देशमुख, शिवरत्न गायकवाड यांनी महोळ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात व मतदारसंघातील सर्वच गावांमध्ये महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी फटाक्यांची आतपबाजी करत गुलालाची मुक्तपणे उधळण करत मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा केला.

मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवलेकर, मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश कुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ पोलीस कर्मचाऱ्यांनी तसेच राज्य राखीव दल व दंगा काबू पथक अशा कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. राजू खरे यांच्या विजयानंतर उसळलेल्या तुफान गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# उद्योजक व नवउद्योजकांसाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचेकडून सुवर्णसंधी

**अकलूज, (कटूसत्य वृत्त):-** माढा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघ व सोलापूर जिल्ह्यातील उद्योजक आणि नवोदित उद्योजकांसाठी गुजरात गांधीनगर येथे शिवरत्न शिक्षण संस्था आणि शिवामृत दूध संघ यांच्या सहकार्याने एक विशेष अभ्यास दौरा आयोजित केला आहे.अभ्यास दौऱ्याचा सर्व खर्च आयोजकांकडून केला जाणार आहे.

> "माझ्या माढा लोकसभा व माढा लोकसभा मतदारसंघातील तरुणांना उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रवीण बनवण्यासाठी, त्यांच्यातल्या उदयोजकतेला संधीं देण्यासाठी गांधीनगर, गुजरात येथे अभ्यास दौरा आयोजित केला आहे. हा दौरा त्यांच्या व्यवसायातील यशाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल. आम्ही त्यांना योग्य मार्गदर्शन, अनुभव आणि प्रेरणा देण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.
>
> **- खासदार मा. धैर्यशील मोहिते-पाटील**



या अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक उद्योजकांना ८ डिसेंबर रोजी शिवरत्न नॉलेज सिटी अकलूज येथे सकाळी 10 वाजता परीक्षेसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. लेखी आणि तोंडी मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उद्योजकांना विविध उद्योगांची पाहणी करण्याची आणि तज्ञांकडून मार्गदर्शन घेण्याची संधी मिळेल.

या उपक्रमाचा उद्देश नवीन उद्योजक निर्माण करणे आणि सध्याचे उद्योजक अधिक सक्षम करणे हा आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांबाबत माहिती देणे, बँकांकडून कर्ज मिळवून देण्यात मदत करणे आणि विविध उद्योग संस्थांशी करार करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश आहे.

# पोलिसांनी सोडला सुटकेचा निःश्वास



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील तीन विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी वेगवेगळ्या ठिकाणी पार पडली. या मतमोजणीच्या ठिकाणी व शहरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. त्यामुळे सर्वत्र मतमोजणी शांततेत पार पडली आणि पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले होते. संपूर्ण राज्यभरात एकाच टप्प्यात मतदान झाल्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी करण्यात झाली. दक्षिण सोलापूर मतदारसंघाची मतमोजणी विजापूर रस्त्यावरील सोरेगाव येथील एसआरपीएफ कॅम्पमध्ये झाली. शहर मध्यची मतमोजणी डफरीन चौकातील नूमवि प्रशालेत तर शहर उत्तरची मतमोजणी पुणे रस्त्यावरील सिंहगड कॉलेज येथे पार पडली. मतमोजणीमुळे नूमवि प्रशालेकडे येणारे रस्ते बॅरिकेडस लावून बंद करण्यात आले होते. मतमोजणी करणारे अधिकारी, कर्मचारी, उमेदवार, त्यांचे प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, प्रतिनिधी यांना मतमोजणी केंद्रात जाण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पासेस देण्यात आले होते. हे पासेस असणाऱ्यांनाच पोलिसांकडून मतमोजणी केंद्रात सोडण्यात आले. यावेळी पोलिसांकडून सर्वांची तपासणी करण्यात आली. प्रसारमाध्यमांचे प्रतिनि वगळता अन्य लोकांना मोबाइल फोन देण्यास बंदी घालण्यात आली होती. ज्या लोकांकडे पास नव्हते, त्यांना पोलिसांनी अडवून मतमोजणी केंद्रात जाऊ दिले नाही. मतदान केंद्र परिसरात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. त्याचप्रमाणे मतमोजणीनंतर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ठिकठिकाणी पोलिसांचे फिक्स पॉईंट लावण्यात आले होते. तसेच पोलिसांकडून प्रमुख रस्त्यांवर गस्त घालण्यात आली. त्याचप्रमाणे पोलिसांनी विविध पक्षांच्या कार्यालयासमोर पोलिसांचा बंदोबस्त ठेवला होता.पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस अधीक्षक अतुलकुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शहर व जिल्ह्यात मतमोजणी पोलीस बंदोबस्ताचे उत्तम नियोजन केले होते. त्याचाच परिपाक म्हणून मतमोजणी शांततेत व कोणतेही गालबोट न लागता पार पडली. त्यामुळे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रे साडेसहा तास उघडी राहणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने अंगणवाडी सेविका व मदतनिसांच्या मानधनात वाढ केली असून ही वाढ करीत असताना त्यांच्या कामाच्या वेळेतही वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. त्यानुसार आता ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रे सकाळी ९.१५ ते दुपारी ३.४५ यावेळेत उघडी राहणार आहेत. यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्तांनी परिपत्रक काढले असून त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना दिल्या आहेत. सरकारने मानधनवाढीबरोबरच कामकाजाची वेळही वाढविली आणि त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. मात्र, ऑक्टोबर महिन्यापासून मानधनवाढ देणे अपेक्षित असताना सरकारने ती अद्याप दिली नाही. मानधनवाढीची अंमलबजावणी नाही मात्र वाढीव वेळेची लगेच सक्ती केली जात असल्याने अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.बालकांच्या कुपोषण निर्मूलनाचे महत्त्वाचे काम करण्याबरोबरच त्यांना पूर्व प्राथमिक शिक्षणाचे धडे देणाऱ्या व तुटपूंज्या मानधनावर काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनिसांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी आंदोलन सुरू केले होते. दीर्घकाळ चाललेल्या या आंदोलनाची सरकारने उशिरा का होईना दखल घेऊन मानधनवाढीचा निर्णय घेतला आणि त्याबरोबरच कामकाजाची वेळही वाढविली. पूर्वी साडेचार तास अंगणवाडी केंद्रे उघडी ठेवण्यात येत होती. त्यात आता दोन तासांची वाढ करण्यात आली असून नवीन नियमानुसार साडेसहा तास अंगणवाडी केंद्रे उघडी राहणार आहेत. कामकाजाच्या वाढीव तासांमध्ये गरोदर महिला व स्तनदा मातांना तसेच कमी वजनाच्या कुपोषित बालकांना द्यावयाच्या सेवा, आहार व आरोग्यविषयक मार्गदर्शन, समुपदेशन आदी उपक्रम राबविण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांची दैनंदिन कामकाजात एकसूत्रता असावी, याकरीता कामकाजाची वेळ १ जुलै ते ३१ मार्च या कालावधीत सकाळी ९.१५ ते दुपारी ३.४५ अशी करण्यात आली आहे. १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत उन्हाळ्यातील तापमानानुसार स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना वेळ निश्चित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

आता नवीन वेळेनुसार अंगणवाडी केंद्रे उघडण्यात येत आहेत. यासाठी प्रशासनाने जी तत्परता दाखविली, ती वाढीव मानधन देण्याबाबत दाखविली त्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांमधून नाराजीचा सूर आळविण्यात येत आहे.

# सिंहगड पब्लिक स्कूल मधील मुलांची नॅशनल सीबीएसई हेरिटेज क्विझ कॉम्पिटिशन साठी निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोमय्या स्कूल विद्याविहार घाटकोपर मुंबई या ठिकाणी झालेल्या राज्यस्तरीय सीबीएसई हेरिटेज कॉम्पिटिशन स्पर्धेमध्ये सिंहगड पब्लिक स्कूलच्या पार्थ कुलकर्णी, उमर इनामदार, अपूर्व गायकवाड या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून दिल्ली येथे होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी पात्र ठरले. राज्यस्तरीय स्पर्धेच्या अगोदर संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून टेस्ट घेण्यात आली होती त्यामधून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी राज्यातून 36 संघांची निवड झाली त्यामध्ये सिंहगड पब्लिक स्कूलच्या संघाची निवड झाली.

जानेवारी मध्ये दिल्ली येथे होणारी ही स्पर्धा हिस्ट्री टिवी १८ वर लाईव्ह दाखवण्यात येणार आहे. मुलांच्या या याच्याबद्दल संस्थेचे संस्थापक एम एन नवले सर, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे, शाळेच्या प्राचार्य स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मुलांचे अभिनंदन केले व नॅशनल स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच मुलांना स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल पालकांचेही विशेष अभिनंदन. या स्पर्धेसाठी मुलांना इतिहास शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# लवकरच आता महापालिका निवडणुकीचे वारे वाहणार ?

## नव्या सरकारच्या स्थापनेनंतर लवकरच निर्णय



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्यानंतर यात महायुतीला मोठे यश मिळाले, आता गेल्या अनेक काळापासून रखडलेल्या महापालिकांच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. बहुतांश ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाहीत, आता या निवडणुका होण्याची चिन्हे आहेत.महत्त्वाची बाब म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकांमार्फत काम केले जात आहे. मुंबई महापालिका असो की,छत्रपती संभाजीनगर महापालिका किंवा राज्यातील अशा बहुतांश महापालिका स्थानिक संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरसह इतर ठिकाणी तर साडेचार ते पाच - स्वराज्य वर्ष उलटून गेली, पण निवडणुका झाल्या नाहीत. येथील लोकांना निवडणुका कधी होतील, याची प्रतीक्षा आहे. महाविकास आघाडी आणि त्यानंतर महायुती सरकारने आपल्या कार्यकाळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या. सध्याच्या परिस्थितीत ९५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे स्थानिक कार्यकत्यांमध्ये नाराजीही आहे.या पार्श्वभूमीवर या रखडलेल्या निवडणुका तातडीने घेण्याबाबत कार्यकत्यांकडून दबाव वाढत असल्याने या निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर महायुती राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास अनुकूल असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे राज्यात लवकरच राज्यात लवकरच स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहतील. विधानसभेच्या एतिहासिक यशानंतर महायुतीच्या नेत्यांमध्ये याबाबत सकारात्मक भूमिका आहे.

# ११ हजार ४८८ मतदारांनी सर्वच उमेदवारांना नाकारले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरासह जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघामधून १८४ निवडणुकीच्या माध्यमातून जनमताचा कौल आजमावला. मात्र, ११ हजार ४८८ मतदारांनी सर्वच उमेदवारांना नाकारले असल्याचे मतमोजणीमध्ये स्पष्ट झाले आहे.सोलापूर शहरात तीन, तर ग्रामीण भागात ८, असे एकूण ११ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघात महायुती,महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांसोबत वंचित बहुजन आघाडी,महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहुजन समाज पक्ष आणि इतर प्रादेशिक,स्थानिक पक्ष आणि अपक्ष, असे १८४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.प्रत्येक मतदारसंघात मतदारांनी नोटाचा पर्याय निवडून आपली नाराजी दर्शविली. मागील विधानसभा निवडणुकीत (२०१९) जिल्ह्यात १२ हजार ९४४ जणांनी नोटाला पसंती दिली होती. त्या तुलनेत यंदा नोटाला कमी जणांनी निवडले.

मोहोळ मतदारसंघात नोटाची मते ही चौथ्या क्रमांकावर असून, सात उमेदवारांपेक्षा जास्त मते नोटाला क्रमांकावर मिळाली. करमाळामध्ये नोटा सातव्या राहिला, तर या मतदारसंघात नोटाला ९ उमेदवारांपेक्षा जास्त मते मिळाली. पंढरपूर मतदारसंघात अनेकांनी नोटाचा पर्याय निवडल्यामुळे नोटा नवव्या क्रमांकावर होता. या मतदारसंघात नोटाने १६ उमेदवारांपेक्षा जास्त मते पटकाविली.अक्कलकोटमध्ये नोटा सहाव्या क्रमांकावर असून, नोटाला ७ उमेदवारांपेक्षा जास्त मते मिळाली.बार्शी मतदारसंघात नोटा आठव्या क्रमांकावर असून, १३ उमेदवारांपेक्षा नोटाला जास्त जणांनी पसंती दिली. शहर उत्तरमध्ये नोटाची मते आठव्या क्रमांकावर होती. १३ उमेदवारांपेक्षा जास्त मते नोटाला पडली. शहर मध्य या मतदारसंघात नोटा आठव्या क्रमांकावर असून, १३ उमेदवारांपेक्षा जास्त मते नोटाला मिळाली.शहर दक्षिणमध्ये नोटा दहाव्या क्रमांकावर १६ उमेदवारांपेक्षा जास्त मते नोटाला, तर सांगोलामध्ये नोटाला चौथ्या क्रमांकावर असून, १० उमेदवारांपेक्षा जास्त मते नोटाला मिळाली. माढा मतदारसंघात नोटा आठव्या क्रमांकाची मते मिळावी. येथे सहा उमेदवारांपेक्षा जास्त मते नोटाला मिळाली. माळशिरसमध्ये नोटाला पाचव्या क्रमांकाची मते मिळाली असून, आठ उमेदवारांपेक्षा जास्त मते नोटाला होती.

# डोळे तपासणी शिबिरात १६४ जणांनी घेतला लाभ



**वाशिंबे (सचिन भोईटे):-** ग्रामदैवत भैरवनाथ देवस्थान वाशिंबे ता. करमाळा येथे अष्टमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता दिनी जे.के. फाउंडेशन वाशिंबे यांच्यावतीने मोफत डोळे तपासणी, चष्मे वाटप व बुधराणी हॉस्पिटल पुणे येथे मोफत डोळ्याचे ऑपरेशन करणे अशा सामाजिक कामाचे मंदिर परिसरात आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १६४ गरजवंतांनी लाभ घेतला. तर ४२ जणांना अल्प दरात चष्मे वाटप करण्यात आले.बुधवार दि.२७ रोजी वाशिंबे येथून २९ पेशंटला बुधरानी हॉस्पिटल पुणे येथे मोफत डोळे ऑपरेशन साठी बस घेऊन जाणार आहे. सर्व सुख सुविधा मोफत पुरवल्या जात आहेत.आतापर्यंत एकुण ६८ जणांचे डोळे ऑपरेशन बुधरानी हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने यशस्वी केले. शिबिरास डॉ.सुदर्शन झोळ यांचे मार्गदर्शन लाभले.

> इतर हॉस्पिटलमध्ये मला ३० हजार रुपये खर्च सांगितला.मी शिबिराचा लाभ घेत बुधरानी पुणे हॉस्पिटल येथे डोळ्यांवरील वाढलेल्या मासचे मोफत ऑपरेशन केले. जे.के.फाऊंडेशनच्या कार्यतुन मला नवीन दृष्टी मिळाली.
>
> **- बाळा रणदिवे,** वाशिंबे

# स्व. यशवंतराव चव्हाण यांना स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रवादीच्या वतीने अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सदैव स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारसरणीवर प्रेरित होऊन लोककल्याणासाठी सतत कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीचे गतिमान चक्र सुरू ठेवण्यासाठी अतुलनीय योगदान देणारे तसेच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या राज्याला सक्षम करणारे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोलापूर शहर राष्ट्रवादीच्या वतीने सात रस्ता येथील स्व यशवंतराव चव्हाण यांच्या पूणार्कृती पुतळ्यास राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते महेश निकंबे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले अमर रहे अमर रहे यशवंतराव चव्हाण अमर रहे च्या घोषणा देत आदरांजली वाहण्यात आली



याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी श्रीनिवास कोंडी आनंद मुस्तारे महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर युवक अध्यक्ष सुहास कदम कार्याध्यक्ष तुषार जक्का युवती अध्यक्ष किरण माशाळकर सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव अल्पसंख्यांक अध्यक्ष आमिर शेख कार्याध्यक्ष संजय मोरे श्खठळ अध्यक्ष रुपेश भोसले डॉक्टर सेल अध्यक्ष डॉ. संदीप माने ओबीसी अध्यक्ष अनिल छत्रबंध सामाजिक न्याय कार्याध्यक्ष अनिल बनसोडे मध्य विधानसभा अध्यक्ष अलमेराज आबादीराजे वाहतूक सेल अध्यक्ष इरफान शेख वैद्यकीय अध्यक्ष बसवराज कोळी सांस्कृतिक अध्यक्ष अशितोष नाटकर सोमनाथ शिंदे महिपती पवार प्रदीप बाळशंकर मुईज मुल्ला युवराज माने शामराव गांगर्डे प्रकाश झाडबुके प्रज्ञासागर गायकवाड अजिंक्य उपिन कांचन पवार प्रिया पवार संगीता घाडगे आदी पदाधिकारी उपस्थित होते.